# को.ए.सो. लोकनेते अॅड. दत्ता पाटील हायस्कूल, बेलोशी

सह्याद्री रांगेच्या कुशीत बसलेले बेलोशी हे एक छोटेशे हायस्कूल या शाळेत एकूण ४८३ विद्यार्थी ज्ञान ग्रहणाचे कार्य करतात. त्यामध्ये २७० विद्यार्थी व २१३ विद्यार्थीनीचा समावेश आहे. आमच्या या शाळेत १७ शिक्षक व ५ शिक्षकेतर कर्मचारी असे एकूण २२ सेवक विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करीत आहेत. यावर्षी इ. १० वी च्या परीक्षेला एकूण ८९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ६२ विद्यार्थी पास होवून शाळेचा निकाल ६९.६६% एवढा लागला या वर्षी प्रथम येण्याचा मान कु. प्रियल नरेश पाटील हिने (८५.००%) गुण मिळविला व कु. हर्षद हेमंत पाटील यांस ७९.००% (व्दितीय) गुण मिळाले. तर तृतीय क्रमांक कु. अभिषेक केशव मोरे यांनी प्राप्त केला. त्यास ७६.८०% गुण मिळाले.

रोहा येथे आयोजित केलेल्या को.ए.सो.वाक्स्पर्धेत कु.मनस्वी मनोहर शेळके हिने इंग्रजी विषयात उत्तेजनार्थ बक्षिस मिळविले. रेवदंडा हायस्कूल येथे आयोजित केलेल्या तालुका विज्ञान स्पर्धेमध्ये आमच्या शाळेचे तुपे सर व श्री. वैशंपायन सर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या प्रतिकृतीला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. श्री. सचिन कांबळे सर यांना लोकनेते अॅड. दत्ता पाटील समाजिक विकास संस्था आयोजित स्वर्गीय दत्ता पाटील गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच श्री. सदानंद थळे यांना सह्याद्री साहित्य मंडळ यांच्यातर्फे अलिबाग मित्र पुरस्काराने गौरविण्यात आले. आमच्या शाळेचे शिक्षक श्री. आर. डी. नाईक सर, श्री. मोहिते सर, श्री. ठाकूर सर व श्री. आर. के. नाईक सर यांनी डी.एस.एम. कोर्स मध्ये प्रथम श्रेणीत पास होण्याचा मान मिळविला.

इ. १० वी चा निकाल वाढविण्याच्या दृष्टीने आमच्या शाहेत इ. १० वी चे जादा तास, सराव परीक्षा व विशेष मार्गदर्शन शिबीर आयोजित केली जातात. त्यांचप्रमाणे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या दिवशी देशप्रेम, देशभक्ती वृद्धींगत होईल असे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच वीर पुरूषांची पुण्यतिथी जयंती यांचे औचित्य साधून वाक्स्पर्धेचे आयोजन केले जाते. पावसाळी क्रीडा स्पर्धेची तयारी म्हणून खो-खो, कबड्डीचा सराव नियमितपणे घेतला जातो. शाळेतील सर्व सेवक शाळा हे एक कुटुंब मानून त्या कुटुंबातील चिमण्या पाखरांचा विकास हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून कार्य करत आहेत. मा.मुख्याध्यापक श्री. एस.जे.पाटील सर यांच्या प्रयत्नाने शाळा प्रगतीकडे वाटचाल करत आहे.





कु. पाटील प्रियल नरेश
एस. एस.सी. (८५.००%)



श्री. थळे सदानंद दामोदर
सह्याद्री साहित्य मंडळ-मित्र पुरस्कार



श्री. कांबळे सचिन काशिनाथ
लोकनेते दत्ता पाटील गौरव पुरस्कार





वृक्षारोपण करताना मा. मुख्याध्यापक, सहाय्यक शिक्षक व विद्यार्थी



२६ जानेवारी २०१६ रोजी अफजलखानाचा वध पोवाडा सादरीकरण करताना

- ✻ भारतात सर्वात जास्त विद्युत निर्मिती महाराष्ट्रात होते.
- ✻ महाराष्ट्रात चलनी नोटांचा कारखाना नाशिक येथे आहे.
- ✻ महाराष्ट्रातील सर्वात जास्त अवर्षणग्रस्त जिल्हा अहमदनगर.
- ✻ भारतातील पहिले पक्षी अभयारण्य कर्नाळा रायगड जिल्हा
- ✻ महाराष्ट्रातील सर्वाधिक पाऊस आंबोली (सिंधुदुर्ग) येथे आहे.
- ✻ पंढरपूर शहर भीमा नदीकाठी आहे. महाराष्ट्राची काशी म्हणतात

- ✻ गोदावरी नदीला दक्षिण भारताची गंगा म्हणतात.
- ✻ प्रवरा नदीच्या खोऱ्यात उसाचे पीक मोठ्याप्रमाणात होते.
- ✻ गरम पाण्याचे झरे ठाणे जिल्ह्यात वज्रेश्वरी येथे आहेत.
- ✻ जगप्रसिध्द लोणार सरोवर बुलढाणा जिल्ह्यात आहे.
- ✻ पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहर बटाट्याच्या व्यापारासाठी प्रसिध्द आहे
- ✻ महाराष्ट्रातील नायकवाडी प्रकल्पाला नाथसागर म्हणतात.